**'मतिमंद - बहुविकलांग '(स्पास्टिक) मुलांच्या पालकांची संस्था**

उमेद परिवार

''**अरविंद सौरभ**'', गट नं. ९४९, वडकी गाव, कानिफनाथ मंदिर पायथा, हडपसर-सासवड मार्ग, पुणे-४१२ ३०८. **फोन : ९८५ ००४ ५४५६**

**व्यवस्थापकीय कार्यालय** : १०१, कॅनॉट प्लेस, १ ला मजला, ऑफ बंडगार्डन रोड, वाडिया कॉलेज समोर, मंगलदास रोड, पुणे ४११ ०११. **फोन: ०२०-४१२६ ७३६०, २६१६ ७२००.**

**E-mail :** info@umedpariwar.org ✤ **Website** : www.umedpariwar.org

संदर्भ क्र.: चि. स्पर्धा-२०१९ दिनांक : १-७-२०१९

# मतिमंद - बहुविकलांग मुलांसाठी राज्यस्तरीय २५ वी चित्रकला स्पर्धा २०१९

**उमेद परिवार**तर्फे महाराष्ट्रातील सर्व मतिमंद आणि बहुविकलांग स्पास्टिक मुलांसाठी २५ वी चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात येत आहे. स्पर्धेसाठी ह्या मुलांनी **भित्तीचित्र (पोस्टर)** आणि **भेटकार्ड (ग्रिटिंग)** काढावयाची आहेत. गेली चोवीस वर्षे आपण सर्वांनी सहकार्य केल्यामुळे आपल्या या मुलांना त्यांची चित्रकृती समाजापुढे मांडण्याची संधी मिळाली. मागील वर्षी एकूण २५ शाळांतील ३८० मुलांनी भाग घेतला होता. **यामध्ये १९५ ग्रीटींग कार्डस् व १८५ पोस्टर्स होती.**

| **स्पर्धेसाठी खालीलप्रमाणे गट असतील** | | | **प्रत्येक गटासाठी खालीलप्रमाणे पारितोषिके असतील** | | |
|---|---|---|---|---|---|
| **गट पहिला** | बुध्यांक ५१ ते ७० | मतिमंद मुले | | **भित्तीचित्र (पोस्टर)** | **ग्रिटींग कार्ड** |
| **गट दुसरा** | बुध्यांक ३० ते ५० | मतिमंद मुले | **पहिले** | रोख रुपये १५०० | रोख रुपये ७५० |
| **गट तिसरा** | बुध्यांक ३० च्या खाली | मतिमंद मुले | **दुसरे** | रोख रुपये १००० | रोख रुपये ५०० |
| **गट चौथा** | बहुविकलांग | स्पास्टिक मुले | **तिसरे** | रोख रुपये ७५० | रोख रुपये ३०० |
| **गट पाचवा** | शिक्षकांसाठी | | | रोख रुपये-वरीलप्रमाणे | रोख रुपये-वरील प्रमाणे |

१. **या स्पर्धेत मतिमंद आणि बहुविकलांग मुलांनाच भाग घेता येईल. या मुलांनी कोणाच्याही मदतीशिवाय स्वत:च काढलेल्या चित्रकृती पाठवायच्या आहेत. विशेष शाळेतील शिक्षकांनासुध्दा या स्पर्धेत भाग घेता येईल.**

२. विशेष शाळात नसलेल्या मतिमंद-बहुविकलांग मुलांनाही या स्पर्धेत भाग घेता येईल. अशा मुलांच्या पालकांनी डॉक्टरांच्या शिफारशीसह आणि त्या मुलांच्या बुध्यांकाच्या दाखल्यासह चित्रकृती पाठवावी.

३. **भित्तीचित्र आणि भेटकार्ड यासाठी कोणताही विषय घेता येईल.**

४. भित्तीचित्रासाठी ५०X३८ सें. मी. आकाराचा ड्रॉईंग पेपर वापरावा. तीन बाजूला प्रत्येकी २.५ सें.मी. आणि खालच्या बाजूला ५ सें.मी. जागा मोकळी सोडून चित्र काढावे. चित्र पुठ्ठयावर चिटकवू नये.

५. **भेटकार्डासाठी ११X१८ सें. मी. कार्ड वापरावे. चारही बाजूंना १ सें. मी. जागा सोडावी.**

६. खालच्या बाजूला ५ से.मी. मोकळ्या जागी काळ्या स्केचपेनने मुलाचे नांव, शाळेचे नाव आणि गट सुवाच्य अक्षरात लिहावा.

७. **भित्तीचित्र व भेटकार्ड पाठवताना प्रत्येक शाळेने खालील तपशील एका कागदावर टाईप करुन तो चित्रकृतीच्या मागे उजव्या कोपऱ्यात वरच्या बाजूस चिटकवावा.**

| | | |
|---|---|---|
| १. मुलाचे संपूर्ण नांव व बुध्यांक | २. स्पर्धा गट क्रमांक | ३. पालकाचे नाव व पत्ता |
| ४. मतिमंद / बहुविकलांग | ५. शाळेचे नाव व पत्ता (रबरी शिक्का) | ६. मुख्याध्यापकाची सही |

८. मतिमंदाच्या प्रत्येक गटासाठी जास्तीत जास्त प्रत्येकी पाच प्रवेशिका पाठविता येतील. **प्रत्येक शाळेला चौथ्या गटात (सी.पी.)** जास्तीत जास्त पाच प्रवेशिका पाठविता येतील. **शिक्षकांना प्रत्येकी २ प्रवेशिका पाठविता येतील.**

९. **शाळांची चित्रे पाठविताना सोबत शाळेच्या लेटर हेडवर एकत्रित तपशील लिहून स्वतंत्र पत्र पाठविणे आवश्यक आहे.**

१०. स्पर्धेसाठी उमेद परिवार तर्फे स्वतंत्र परिक्षक समिती नेमली जाईल. परिक्षकांचा निर्णय अंतिम राहील.

११. **मुलांचे कौतुक व्हावे म्हणून स्पर्धेसाठी आलेल्या सर्व चित्रकृतींचे पुण्यात प्रदर्शन भरवण्यात येईल.**

१२. स्पर्धेसाठी आलेल्या चित्रकृतींचे हक्क उमेद परिवारच्या स्वाधीन असतील.

१३. **चित्रकृती पाठविण्याची अखेरची तारीख ३० सप्टेंबर २०१९ आहे. चित्रकृती 'व्यवस्थापकीय कार्यालय' या पत्त्यावर पाठवाव्यात.**

१४. सदर स्पर्धेचे पत्र मिळाल्यावर पोहोच पत्र पाठवावे. आपल्या सूचनांचे स्वागत आहे.

**पुरुषोत्तम शर्मा**
अध्यक्ष

**राजेंद्र नहार**
सचिव

**उमेद परिवारचे बदललेले पत्ते आपल्या रेकॉर्डमध्ये बदलून घ्यावेत.**